**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाचा सदतिसावा दीक्षांत समारंभ २९ मे रोजी

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा सदतिसावा दीक्षांत समारंभ शनिवार, दि. २९ मे, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता आभासी पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे. आजवर विद्यापीठाने छत्तीस दीक्षांत समारंभाचे अतिशय उत्कृष्टपणे, शिस्तबद्ध व सुचारु पद्धतीने आयोजन केले आहे.

सदतिसाव्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा कुलपती श्री भगत सिंह कोश्यारी भूषविणार असून रस्ते वाहतुक व परिवहन आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकारचे केंद्रीय मंत्री ना.श्री नितीन गडकरी प्रमुख अतिथी म्हणून दीक्षांत भाषण करतील. महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना.श्री उदय सामंत विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार असून कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर स्वागतपर व प्रास्ताविक भाषण करतील. समारंभाला प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे. तसेच या दीक्षांत समारंभाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य व विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित राहणार आहेत.

कोविड - १९ च्या प्रादुर्भावामुळे दीक्षांत समारंभाचे थेट प्रक्षेपण https://youtu.be/a4cEgNS8jZ0 लिंकवरुन होणार आहे. तरी दि. २९ मे, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता आभासी पद्धतीने संपन्न होत असलेल्या सदतिसाव्या दीक्षांत समारंभाची नोंद विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी तसेच सर्व संबंधितांनी घ्यावी व कार्यक्रमाला आभासी पद्धतीने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २२/०५/२०२१.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी